—: प्रेस नोट :— दिनांक : ११/०४/२०१९

यातील लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्या टेरेसवरील अनधिकृत बांधकाम निष्कासीत न करण्याकरीता मागणी केलेल्या रु. ३,५०,०००/ पैकी रु. २,५०,०००/— रक्कमेची लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३८/२०१८ |
| कलम | कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) महेश व २) धीरज कांबळे ( धंदा—नोकरी ( सुपरवायझर, इमारत व कारखाने विभाग, सी वॉर्ड,मनपा.बृहन्मुंबई )<br>३) चंद्रकांत महादेव कांबळे, वय ५७ वर्षे, धंदा—नोकरी ( मुकादम, इमारत व कारखाने विभाग, सी वॉर्ड,मनपा.बृहन्मुंबई ) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ३,५०,०००/— |
| स्विकारलेली रक्कम | रु. २,५०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी रहात असलेल्या टेरेस फ्लॅटच्या ओपन टेरेसवर फिर्यादी यांनी खाजगी कॉन्ट्रॅक्टरकडुन शेड, ग्रिल व भिंतीचे बांधकाम केले होते. सदर बांधकामापैकी काही भागाचे निष्कासन सी वॉर्ड, मनपा कार्यालयाकडुन करण्यात आले होते. त्यानंतर माहे जुन २०१८ मध्ये फिर्यादी यांचे घरी सी वॉर्डमधील दोन कर्मचारी आले व त्यांनी उर्वरित अनधिकृत बांधकाम निष्कासीत करायचे नसल्यास नमुद वॉर्डमधील दोन इंजिनियर व संबंधीत कर्मचारी यांना मॅनेज करण्यासाठी फिर्यादीकडुन रुपये ५०,०००/— व त्यानंतर रुपये ३,५०,०००/— इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांची लोकसेवकांस लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी फिर्यादीकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने लोकसेवक यांचेविरुध्द दिनांक ३१/१०/२०१८ रोजी वरील नमुद प्रमाणे आलोसे क्र. १ व २ यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.<br><br>नमुद आलोसे क्र. १ व २ यांचे वतीने आलोसे क्र. ३ यांनी आज दिनांक ११/०४/२०१९ रोजी फिर्यादीकडुन मागणी केलेल्या लाचेची रक्कम रुपये ३,५०,०००/— पैकी रुपये २,५०,०००/— लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.**
**संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in**
**ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - www.acbmaharashtra.net**
**टोल फ्री क्र. १०६४**
**दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,**
**व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००**

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

११/४/१९

( दिनकर पिंगळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग.

Scanned by CamScanner